||श्री राम समर्थ||
||श्री नागनाथ प्रसन्न||
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्षे
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेज थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २१७ वा | शुक्रवार, दि. ०३ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सुनेत्रा पवारांच्या खमक्या नेतृत्वाची चुणूक

## चाकणकर, अरोराच नाही तर 'लेडी बॉस'चा तटकरे, पटेलांनाही धक्का

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ताब्यात घेण्यासाठी पक्षातील मोठ्या नेत्यांमध्ये एकच चढाओढीने सुरु झालेला सत्तासंघर्ष अवघ्या देशाने पाहिला.

पक्षात नवा राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडप्रक्रिया पूर्वीच केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी राष्ट्रीय अध्यक्षपदी प्रफुल पटेल यांची निवड झाल्याचे वक्तव्य केले होते. मात्र अवघ्या काही तासांतच त्यांनी वक्तव्य मागे घेऊन परिस्थिती शमवण्याचा प्रयत्न केला. मात्र गोयलांच्या या वक्तव्याने पक्षात अंतर्गत सत्तासंघषार्ला सुरुवात झाली. सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्यानंतरही पटेल यांनी पक्षाचे सर्व अधिकार आपल्याला मिळावेत याबाबत निवडणूक आयोगाकडे पाठपुरावा केला होता. यामुळे पक्षात पवार विरुद्ध पटेल, तटकरे असा सौम्य पण अंतर्गत तीव्र धुसफुसीने माजलेला सत्तासंघर्ष सुरु असेलेला ठळकपणे दिसून येतो.

पक्षाचे सर्वेसर्वा असेलेल्या सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होण्याआधीच पक्षाचा ताबा मिळवण्यासाठी पटेल – तटकरे यांची धडपड, त्याबाबत निवडणूक आयोगाशी केलेला पत्रव्यवहार समोर आल्यानंतर पवार या पटेल – तटकरेंवर तीव्र नाराज असल्याचे बोलले जात होते. त्यातच अजित पवार ह्यात असताना पक्षाला गुलाबी रंगात झोकळणारे, राजकीय पक्ष डिझाईन रणनीतीकार नरेश अरोरा यांनाही सुनेत्रा पवारांनी बाहेरचा रस्ता दाखवला. तर नुकत्याच आयोगाला पाठवलेल्या एका पत्रात पवारांनी तटकरे आणि पटेलांच्या पदांचा उल्लेख जाणीवपूर्णक टाळून त्यांनाही पक्षात आपली जागा दाखवल्याची राजकीय वर्तुळा त जोरदार चर्चा आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसवर प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष दावा करणाऱ्या पक्षातील सर्व नेत्यांचे पंख छाटण्याचे काम सुनेत्रा पवारांनी हाती घेतल्याचे दिसते. पक्षामध्ये आपणच एकमेव बॉस असल्याचा संदेश पवारांनी पक्षात पोहोचवला. यामुळे पक्षात जो कोणी आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाऊन कारवाया करतील, त्यांना त्यांची जागा दाखवण्याची तयारी सुनेत्रा पवारांनी अप्रत्यक्षपणेच मागील काही कृतीतून दाखवून दिले. पक्षाची पॉवर ही फक्त पवारांच्या हातात आहे, असा स्पष्ट संकेत पक्षात वरिष्ठ पातळीपासून ते तळापर्यंत पोहचवण्यात सुनेत्रा पवार यशस्वी ठरल्या आहेत.



**पार्थ पवारांकडून तीव्र शब्दांत निषेध**

पार्थ पवार यांनी या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करताना म्हटले की, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांना लक्ष्य करणारे निराधार अहवाल आणि केवळ तर्कवितर्कावर आधारित कथा म्हणजे निव्वळ कल्पित कथाच आहेत. त्यांची अनेक दशकांची अढळ निष्ठा आणि नेतृत्व आम्हा सर्वांना आजही मार्गदर्शित करत आहे. अशा ज्येष्ठ नेत्यांना हेतुपुरस्सर निर्माण केलेल्या वादांमध्ये ओढणे अत्यंत दुर्दैवी असून, या गोष्टीचा तीव्र शब्दांत निषेध व्हायलाच हवा, असे म्हणत पार्थ पवार यांनी संताप व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर अजित पवारांचा एक हाती 'होल्ड' होता. आता अजित पवारांनंतर आपल्याच हाती राष्ट्रवादी काँग्रेसची संपुर्ण धुरा आहे, ती कायम राहिल याची सर्व काळजी सुनेत्रा पवार घेत आहेत. यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात खमक्या नेतृत्वाची चुणूक दाखवत, एका नव्या आयर्न लेडीचा उदय झाला, असे म्हंटल्यास काहीच वावगे ठरणार नाही. सुनेत्रा पवारांच्या रुपातल्या या आयर्न लेडी पक्षावर एकहाती वचक निर्माण करुन, पक्ष संघटनेवर अधिकाधिक घट्ट पकड निर्माण करतील, असे तरी आज चित्र दिसत आहे.

**काय आहे वाद ?**

उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पक्षाची जबाबदारी सांभाळल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी 25 मार्च रोजी निवडणूक आयोगाला पत्र लिहून 28 जानेवारी 2026 रोजीनंतर पक्षाने केलेला कुठलाही पत्रव्यवहार वैध मानू नये, अशी विनंती केली होती. त्यानंतर रोहित पवार यांनी आरोप केला होता की, अजितदादांचे निधनानंतर 18व्या दिवशी अर्थात 16 फेब्रुवारीला प्रफुल पटेल, सुनील तटकरे आणि ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी निवडणूक आयोगाला एक पत्र दिले. त्या पत्रावर प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या सह्या होत्या. दोन्ही नेत्यांनी निवडणूक आयोगाला म्हटले होते की, आमच्या पक्षाची घटना बदलली आहे. जर पक्षाला राष्ट्रीय अध्यक्ष नसेल आणि नॅशनल वर्किंग प्रेसिडेंटकडे (कार्यकारी अध्यक्ष) पक्षाची ताकद असेल, तर ते सर्व निर्णय घेतील. मात्र पक्षाच्या विद्यमान अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना या पत्राची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी 10 मार्चला निवडणूक आयोगाला पत्र लिहिले, असा दावा रोहित पवार यांनी केला होता. हे पत्र बुधवारी समोर आले आणि खळबळ उडाली आहे. कारण जेव्हा एखाद्या व्यक्तीची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड होते, तेव्हा निवडणूक आयोगाकडे पक्षाशी संबंधित सर्व कागदपत्रे सादर करावी लागतात. पक्षाच्या कार्यकारिणीमध्ये कोण –कोण आहे ? आणि त्यांच्या नावाची यादी निवडणूक आयोगाला पाठवावी लागते. त्यानुसार 26 फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी 10 मार्च रोजी निवडणूक आयोगाला पत्र पाठवत 13 नावांचा उल्लेख केला होता. या पत्रात सुनेत्रा पवार यांच्या नावासमोर राष्ट्रीय अध्यक्षा आणि शिवाजीराव गर्जे यांच्या नावासमोर खजिनदार असा होता. मात्र प्रफुल पटेल हे अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष आहेत, तर सुनील तटकरे हे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. असे असतानाही दोन्ही नेत्यांच्या समोर त्यांच्या पदाचा उल्लेख नव्हता. त्यानंतर आता सुनेत्रा पवार दिल्ली दौऱ्यावर असताना दोन्ही नेते अनुपस्थित आहेत. त्यामुळे चर्चांना उधाण आले आहे.

## लक्ष्मण हाके हा राजकीय दलाल; पुतळ्याला विरोध केल्यास रस्त्यावर कपडे काढून मारू : बाळराजे आवारेंचा इशारा

**माढा (कटूसत्य वृत्त):-** ज्या कोणी माणसाने सकाळी नऊ वाजता येतो, असं सांगितलं होतं, त्या माणसाला माझं एवढंच म्हणणं आहे की, बाबा तुझा जातीयवाद तुज्याकडे ठेव.

त्यानंतर जर तू शिवाजी महाराजांना विरोध केला तर तुला रस्त्यावर कपडे काढून मारले जाईल, असा इशारा बाळराजे आवारे पाटील यांनी नाव न घेता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना दिला आहे.

माढा तालुक्यातील अंजनगाव येथील खेलोबा मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभाण्यात आला आहे, त्यावरून अंजनगावमध्ये वातावरण पेटले आहे.



पोलिसांनी बुधवारी लाठीचार्ज केला होता. त्यामुळे वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले आहे.

बाळराजे आवारे म्हणाले, अंजनगाव खेलोबा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा विषय आपण शांततेच्या मागार्ने सोडवू, असं माझं प्रशासन आणि शिवप्रेमींना आवाहन आहे. पण पोलिसांकडून लाठीचार्ज झालेली घटना अत्यंत चुकीची आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविल्यानंतर एवढी आक्रमक भूमिका घेण्याची काही गरज नव्हती.

ही जागा खेलोबा मंदिराची आहे की बीएंडसीची आहे, याचा पुरावा असलेला ७/१२ उतारा आमच्याकडे आहे. ही जागा मंदिराची नाही. जरी ही जागा मंदिराची असली तरी आज महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच मंदिरावरील कळस आणि दारावरील तुळस आहे. त्यामुळे कुठल्याही मंदिराने, धमार्ने आणि जातीने शिवाजी महाराजांना विरोध करायचे कारण नाही, असेही आवारे यांनी म्हटले आहे.

आम्ही कुठल्या आमदार किंवा नेत्याच्या सांगण्यावरून काम करत नाही. आम्ही आतापर्यंत शिवाजी महाराज, अहिल्यादेवी होळकर, अण्णाभाऊ साठे यांचे २७० पुतळे आम्ही बसविले आहेत. ज्याठिकाणी परवानगी मिळाली आहे, तिथं परवानगी घेऊन, तर जिथं परवानगी मिळालेली नाही, त्या ठिकाणी विना परवानगीने पुतळे बसविले आहेत, असेही आवारे यांनी म्हटले आहे.


आवारे म्हणाले, फक्त चार लोकांनी हा वाद निर्माण केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे आराध्य दैवत आहेत आणि त्यांचे पुतळे आम्ही विना परवानगीनेच बसवणार, हे मी ऑन कॅमेरा सांगतो. आम्ही यापुढेही असे पुतळे बसविणार आहोत.

लक्ष्मण हाके राजकीय दलाल आहे. धनगर समाजाला आमच्यामुळे त्रास झालेला नाही, आम्ही अहिल्यादेवी होळकरांचे स्मारक बसवलेले आहे. त्यांचे विचार आम्ही जपलेले आहे, त्यामुळे हाकेंनी आम्हाला काही सांगू नये, असेही आवारे यांनी म्हटले आहे.

## कार्तिकेयन एस सोलापूरचे नवे जिल्हाधिकारी

### कुमार आशीर्वाद नागपूरचे जिल्हाधिकारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नागपूर जिल्हाधिकारी पदी बदली झाली आहे त्यांच्या जागेवर कोल्हापूरचे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस यांची नियुक्ती करण्यात आली आहे असे पत्र सामान्य प्रशासन महाराष्ट्र राज्य सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी काढले. तब्बल पावणेतीन वर्ष सोलापूरचे कामकाज पाहताना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापुरात सेवा बजावली आहेत. आषाढी वारी यशस्वी करताना सोलापूरचे विमानतळचा प्रश्न त्यांनी सोडवून विमानसेवा सुरू करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्याचबरोबर आयटी पार्क साठी ही त्यांनी झोकून देऊन काम केले.



यासह प्रशासनामध्ये शिस्त लावली. पंढरपूरच्या कॉरिडॉरचा प्रश्न सुद्धा अतिशय व्यवस्थितपणे हाताळत तो शेवटच्या टप्प्यात आणून ठेवला आहे. कार्तिकेयन हे २०२० बॅचचे भाप्रसे आधिकारी आहेत. याआधी त्यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, किनवट, नांदेड येथे सेवा बजावली आहे. कार्तिकेयन हे सनदी लेखापाल (Chartered accountant) आहेत. सध्याचे कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर कार्यरत होते.

## अंजनगावमधील पुतळ्याचा वाद मिटण्याचे संकेत; निघणार तोडगा

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्याच्या अंजनगावमधील खेलोबा मंदिराच्या प्रवेशद्वारालगत उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यात गावात गेली दोन दिवसांपासून तणावाची परिस्थिती आहे.

पुतळ्याच्या वादाप्रकरणी तोडगा निघण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

पुतळा बसवलेल्या जागेची मोजणी करून ती जागा सरकारी असेल तर पुतळा आहे त्याठिकाणी ठेवण्यात येईल आणि जागा खेलोबा देवस्थान ट्रस्टच्या मालकीची असेल तर पुतळा हटविण्यात येईल, असा तोडगा निघण्याचे संकेत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावरून अंजनगावमध्ये बुधवारपासून तणावाची परिस्थिती आहे. दगडफेक आणि तहसीलदारांची गाडी उलथवून टाकण्यात आली होती.

त्यामुळे अंजनगावमध्ये स्फोटक परिस्थिती होती. मात्र, जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी आणि आमदार अभिजीत पाटील यांनी दोन्ही बाजूंशी चर्चा करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला आहे.




आमदार अभिजीत पाटील म्हणाले, दोन्ही बाजूंशी चर्चा केली असून आणखी काही लोकांशी चर्चा करणार आहे. प्रशासनाशी मी आता बोलत आहे. मी बुधवारी मुंबईत होतो, मी सकाळी माढ्यात आलो आहे. सकाळपासून मी सगळ्यांशी चर्चा करत आहे.

कोणताही तेढ न निर्माण होता, कोणाच्याही भावना न दुखावता योग्य त्या पद्धतीने सर्वांना विश्वासात घेऊन गावाला जे पाहिजे, जे आवश्यक आहे, त्यांचा भावनाचा आदर करून आम्ही त्यातून मार्ग काढू, असे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

जागेची पार्श्वभूमी काय आहे, हे समजून घेत आहे. मी काही लोकांशी चर्चा केली, आणखी काही लोकांशी चर्चा करणार आहे.

आम्ही सवार्नुमते योग्य तो तोडगा काढणे गरजेचे आहे. अंजनगावात शांतता निर्माण करणे आणि सगळ्यांना सोबत घेऊन जाणे, हे महत्वाचे आहे. लक्ष्मण हाके यांनाही विनंती आहे की, आपण सगळेजण मिळून एकत्रितपणे यावर तोडगा काढूया.

**असा निघणार तोडगा**

जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी आणि आमदार अभिजीत पाटील यांनी दोन्ही समाजाशी चर्चा केली आहे. पुतळा बसवलेली जागा कोणाची आहे, हे तपासले जाईल, त्या जागेची मोजणीही करण्यात येणार आहे. जागा खेलोबा देवस्थानची असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हटविण्यात येईल आणि जागा सरकारी मालकीची असेल तर पुतळा आहे त्या ठिकाणी ठेवण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## नागरिकांनी गॅस एजन्सी समोर ई केवायसी व बुकिंग ची माहिती घेण्यासाठी रांगा लावू नयेत - जिल्हाधिकारी आशीर्वाद

### नागरिकांनी अफवावर विश्वास ठेवू नये, जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व एलपीजीचा तुटवडा नाही



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात बीपीसीएल, आयओसीएल व एचपीसीएल या तीन गॅस कंपनीच्या एकूण २० गॅस एजन्सी कार्यरत आहेत. यातील सात गॅस एजन्सी समोर नागरिक ई केवायसी साठी तसेच गॅस सिलेंडर साठी मोठ्या प्रमाणावर गर्दी करत असल्याचे निर्देशनास आले आहे. तरी नागरिकांनी घरी बसून क्यू आर कोडच्या माध्यमातून ई केवायसी करावे व तर गॅस कंपन्यांनी गर्दी होणाऱ्या गॅस एजन्सींना वाढीव गॅस सिलेंडर पुरवठा करून त्या एजन्सीनी गॅस सिलेंडरचा पुरवठा घरपोच करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात गॅस पुरवठा करणाऱ्या कंपन्यांच्या तसेच गर्दी होणारा शहरातील सात गॅस एजन्सी प्रतिनिधी यांच्या समवेत आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे, गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक रघुकुमार, एचपीसीएलचे सागर चव्हाण व आयओसीएलचे सागर गौतम यांच्यासह गॅस एजन्सी चे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की, जिल्ह्यातील गॅस एजन्सी समोर गर्दी होऊ नये यासाठी प्रशासनाने २३ मार्च रोजी स्पष्ट आदेश दिले आहेत. तरी सोलापूर शहरातील काही ठिकाणी गॅस एजन्सी समोर सिलेंडर साठी रांगा लागत आहेत. तसेच एजन्सीच्या म्हणण्याप्रमाणे ई केवायसी साठी नागरिक मोठ्या प्रमाणावर येत असल्याने ई केवायसी साठी प्रशासनाच्या वतीने क्यूआर कोड उपलब्ध करून देण्यात येत आहे. नागरिकांनी घरी बसूनच ऑनलाइन ई-केवायसी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

सोलापूर जिल्ह्याच्या एलपीजी गॅस पुरवठा मध्ये बदल झालेला नाही, परंतु पॅनिक बुकिंग मुळे गॅस सिलेंडरच्या मागणीत अडीच पट वाढ झालेली आहे.

त्यामुळे सिलेंडरचा पुरवठा करण्यात वेळ लागत आहे. पॅनिक बुकिंग कमी झाल्यानंतर लोकांना गॅस सिलेंडर वेळेत मिळणार आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवावर विश्वास ठेवू नये. व गरज नसताना बुकिंग करू नये. सोलापूर जिल्ह्यासाठी पेट्रोल, डिझेल व एलपीजी चा मागणीप्रमाणे साठा उपलब्ध होत आहे. गॅस एजन्सी समोर सिलेंडर साठी येऊ नये, ऑनलाइन बुकिंग करावे व घरपोच सिलिंडर उपलब्ध करून घ्यावा. ज्या गॅस एजन्सी ना गॅस सिलेंडरचा अतिरिक्त साठा आवश्यक असेल त्यांनी तशी मागणी नोंदवावी व मिळालेला साठा हात ऑनलाइन बुकिंग केलेल्या ग्राहकांनाच घरपोच पोहोचवण्याचे योग्य नियोजन करावे. त्यासाठी अतिरिक्त वाहने व डिलिव्हरी बॉय उपलब्ध करून घ्यावेत, असेही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी निर्देशित केले.

गॅस एजन्सीमध्ये ई केवायसी करण्यासाठी तसेच बुकिंग ची माहिती विचारण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत असल्याने जिल्हा प्रशासनाकडून ग्राहकांसाठी तक्रार निवारण केंद्र उभारले जात असून यासाठी पुरवठा विभागाचे तीन कर्मचारी तसेच एचपीसीएल बीपीसीएल व आयओसीएल या कंपनीचा एक एक प्रतिनिधी नियुक्त करण्यात येत आहे. या कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडे गॅस सिलेंडरच्या अनुषंगाने आलेल्या तक्रारी विषयी त्यांचे निवारण करून समाधान करणे अपेक्षित असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

गॅस कंपनीचे जिल्हा समन्वयक रघुकुमार यांनी तिन्ही कंपन्यांच्या वतीने गॅस सिलेंडरची वाढीव मागणी असलेल्या गॅस एजन्सींना पुरवठा करण्यात येईल असे सांगितले. तसेच ग्राहक तक्रार निवारण केंद्रासाठी एक एक कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येईल असेही त्यांनी म्हटले.

प्रारंभी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी सोलापूर शहरातील गॅस एजन्सी ची माहिती देऊन यातील सात गॅस एजन्सी समोर नागरिक मोठ्या प्रमाणावर रांगा लावत असल्याचे सांगितले.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरुम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिझेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

## संपादकीय

# युवक, पदवी आणि रिकामे हात: कोण जबाबदार?

काही गोष्टींची आपल्याला इतकी सवय होवून जाते की, त्या मोठ्या समस्या आहेत, त्यांचे गंभीर आणि दूरगामी परिणाम आहेत; पण त्या सोडविणे शक्य आहे, याची संवेदना आणि बुद्धीच हरवून जाते.याला ह्यसामान्यीकरणह्व किंवा इंग्रजीमध्ये 'नॉर्मलायझेशन'असे म्हणतात. उदाहरणार्थ भारतात प्रत्येक रिकाम्या आणि मोकळ्या जागेत कचऱ्याचे ढीग असणारच. लोकलमध्ये श्वास गुदमरेपर्यंत गर्दी असणारच इत्यादी.कोणत्याही समस्येपेक्षादेखील जास्त गंभीर गोष्ट असते, ती तिचे सामान्यीकरण.

तीच आता भारतात बेरोजगारीबाबत झाली आहे. विशेषत: पदवीधरांच्या बेरोजगारीबाबत.सध्या इराणवर अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हल्ल्यामुळे सुरू असलेल्या युद्धपरिणामांची चर्चा सुरू आहे. युद्धामुळे भारताची निर्यात-आयात तसेच देशातील इंधनाच्या किंमती यावर अत्यंत विपरित परिणाम होतील, हे तर स्पष्ट आहे. त्यामुळे एकूणच औद्योगिक क्षेत्रातील मंदीची शक्यता असल्याने बेरोजगारीदेखील वाढेल, असे या समस्येचे सामान्यीकरण केले जाण्याची शक्यता आहे.

परंतु, देशातील बेरोजगारीची समस्या ही तत्कालिक नाही, किंबहुना ती मुख्य समस्या नसून एका मोठ्या व्यवस्थात्मक अरिष्टाचे लक्षणमात्र आहे, हे समजावून घ्यावे लागेल.असे का आणि कसे ते पाहू. त्यासाठी प्रथम ही बेरोजगारी कशाला म्हणतात आणि ती आहे तरी किती हे समजले पाहिजे.

इथे रोजगार याचा अर्थ, उत्पन्न मिळविण्याच्या अपेक्षेने पुरविलेली कोणतीही सेवा किंवा श्रम. त्यामध्ये नोकरी, व्यापार-उद्योगसंचालन, शेती इत्यादी सर्व प्रकारची कार्ये येतात. रिक्षावाल्यापासून ते सर्वोच्च व्यवस्थापकापर्यंत आणि पथारीवाल्यापासून ते मोठ्या उद्योगपतींपर्यंत सर्वांचा समावेश 'रोजगार असणारे' या सदरात होतो. बेरोजगार म्हणजे जे रोजगार शोधत आहेत, पण त्यांना तो काही विशिष्ट कालावधीपर्यंत मिळू शकत नाही, असे लोक. आता हा कालावधी किती समजला जातो, याची तांत्रिक तपशील विस्तारभयास्तव बाजूस ठेवू. जर एखाद्याला रोजगार नसेल, आणि तो शोधतदेखील नसेल, तर त्याला बेरोजगार असे समजले जात नाही.

भारतामध्ये १५ ते ६५ हे काम करण्यायोग्य वय आहे. या वयातील संपूर्ण लोकसंख्येच्या संदर्भाने पाहिले, तर भारतात बेरोजगारीचे प्रमाण सुमारे ५.६ टक्के होते .(पीरिऑडिक लेबर फोर्स, सर्वे जून २०२५). मात्र त्याच वेळी १५ ते २९ या युवा वयोगटामध्ये १४ टक्के म्हणजे सुमारे ५ कोटी युवक बेरोजगार होते. हे आकडे अपवादात्मक नाहीत. वर्ष आणि महिना बदलला तरी या संख्येमध्ये फार तर अर्धा किंवा एक टक्क्याचा फरक पडू शकतो.

शिक्षणामुळे माणसाची रोजगारक्षमता वाढते, असे म्हणले जाते. जेवढे शिक्षण अधिक तेवढी बेरोजगारीची शक्यता कमी, असे वाटते. परंतु प्रत्यक्षात असे दिसते की, २० ते २९ वयोगटातील पदवीधरांचा विचार केला, तर त्यातील ४० टक्के पदवीधर बेरोजगार होते. या वयोगटातील एकूण बेरोजगार १०० समजले तर त्यातील ६७ टक्के बेरोजगार होते. (स्टेट ऑफ वर्किंग इन इंडिया २०२५ अहवाल- अझीम प्रेमजी विद्यापीठ ).

सर्व आकडेवारीचा सारांश सांगायचा तर, युवा वयोगटात देशातील सुमारे २७ टक्के लोकसंख्या म्हणजेच ३७ कोटी लोक आहेत. भारतात विविध अहवालांनुसार सुमारे पाच कोटी युवा बेरोजगार आणि सुमारे १ कोटी १० लाख इतके पदवीधर बेरोजगार २०२३ या वर्षात होते.

समस्येचे बदलते गंभीर स्वरूप

युवा वयोगटातील पदवीधरांमध्ये बेरोजगारांचे मोठे प्रमाण ही भारतातील गेली ४० वर्षे असणारी समस्या आहे, हे खरे. पण म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे अत्यंत धोकादायक आहे. कारण ती गेल्या काही वर्षांत संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या ही समस्या गंभीर स्वरूप धारण करते आहे. उदाहरणार्थ, १९८३ मध्ये एकूण युवा बेरोजगारांपैकी (२० ते २९ वयोगट), फक्त १३ टक्के बेरोजगार हे पदवीधर होते. तर तेच प्रमाण आज ६७ टक्के इतके झाले आहे. १९८३ मध्ये या बेरोजगार पदवीधरांपैकी बहुतेक पदवीधर हे समाजातील उच्च किंवा मध्यम उत्पन्नगटातील असल्याने ते पदवीनंतर त्यांना हवी असणारी संधी मिळेपर्यंत थांबू शकत होते, आता तसे नाही.

समाजातील तळाच्या स्तरापर्यंत उच्च शिक्षणाची संधी पोचल्यामुळे तेथून येणाऱ्या पदवीधरांची संख्या खूप वाढली आहे. शिवाय त्यावेळी पदवीपर्यंतचे शिक्षण हे सरकारी खर्चावर असल्याने स्वस्त होते. मात्र गेल्या २० वर्षांत माध्यमिक पासून उच्च शिक्षणापर्यंतच्या खासगीकरणामुळे शिक्षणावर गरीबांनादेखील कराव्या लागणाऱ्या खर्चामध्ये कित्येकपटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे जे गरीब पदवीपर्यंत पोचून शिक्षण घेतात. त्यांना तात्काळ रोजगाराची नितांत गरज असते. पण या बहुतेक खासगी शिक्षणसंस्थांचा दर्जा अत्यंत खालावला आहे. त्यामुळे, तसेच आर्थिक व्यवस्थात्मक कारणांमुळे पदवीनंतर ४ वर्षे थांबूनदेखील त्यांना रोजगार मिळू शकत नाही.सामाजिक-मानसिकदृष्ट्या विचार केला, तर ही बाब अत्यंत दुःखदायक नव्हे तर चिंताजनक ठरते.

आता हे लक्षात घ्यावे लागेल की, बेरोजगारीची समस्या ही केवळ काही व्यक्तींची ह्यआर्थिकह्ल समस्या नाही, केवळ युवकांची तर नाहीच नाही. देशासाठी ती सार्वत्रिक अरिष्टाची आणि सामाजिक अधःपतनाची सुरुवात आहे. युवकांना अर्थहीनतकडे नेणारी कोंडी आहे. कारण माणसाचे नागरिकत्व आणि मनुष्यत्व ज्या दोन गोष्टींनी निश्चित होते, त्यातील पहिली आहे शिक्षण आणि दुसरी आहे, रोजगाराची संधी.

ही तर आर्थिक दिवाळखोरी

भारतासारख्या देशाच्या दृष्टीने विचार केला तर बेरोजगारीची समस्या इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि तीदेखील दीर्घकाळ असणे, याचा आपण देश म्हणून विचार केला, तर आपली सर्व व्यवस्था पूर्ण अपयशी ठरत असल्याचा निर्णायक पुरावाच आहे. बेरोजगारी ही आकाशातून पडलेली नैसर्गिक आपत्ती नाही. विकास शिक्षण आणि रोजगार हे सर्व घटक एकत्र न आणू शकणाऱ्या शासनाची आणि आर्थिक सामाजिक व्यवस्थेची ती निर्मिती आहे.

एका बाजूला किमान ७० टक्के लोकसंख्येच्या पिण्यायोग्य पाणी, अन्न वस्त्र निवारा, यादेखील गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. जगण्यायोग्य शहरे, गावे नाहीत. वने नामशेष होत आहेत. शहरात नद्यांची गटारे बनविली जात आहेत. तर ग्रामीण भागात त्या कोरड्या ठाक बनल्या आहेत. आरोग्य, शिक्षण इत्यादी किमान मानवी गरजांची पूर्तता होत नाही. मात्र दुसरीकडे सर्व जनतेच्या या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी नैसर्गिक साधनांची उपलब्धता आहे. तिसरीकडे या नैसर्गिक साधनांवर काम करण्यासाठी मनुष्यशक्ती उपलब्ध आहे. पण तरीदेखील यांची सांगड आपण घालू शकत नाही. हीच या देशाची मुख्य समस्या आहे.

स्पर्धा परीक्षा-एक सामूहिक भानामती !

स्पर्धा परीक्षा म्हणजे शेकडो तहानलेल्या लोकांसाठी एक पाण्याचे पिंप आणि चार ग्लास ठेवून, त्यांची मजा बघण्याचा प्रकार आहे. १० लाख परीक्षार्थींमधून १००० जणांची निवड, म्हणजे १००० युवक युवतींमधून एकजण निवडणार. ही स्पर्धा नव्हे, संघटितपणे केलेली चेष्टाच आहे. गावाकडचे हजारो युवक युवती आपापल्या घरातील दोन-तीन एकराची जमीन गहाण ठेवून, परंपरागत घरे विकून कसे तरी पोट भरून, क्लासेसच्या एक एक लाख रुपयांच्या फीज भरत आहेत. या स्पर्धा परीक्षांमध्ये ३-४ वर्षे घालत आहेत. कोणी प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण होऊन मुख्य परीक्षेतून परत आला, तर पुन्हा पायथ्यापासून सुरुवात करतो आहे. ९९९ जणांच्या पदरात अखेरीस काय? तर आपण अपात्र असल्याचा एक शिक्का. पाठीवर निराशेचे एक कुबड !! जे लपविता येत नाही आणि कशाचे आहे, हे उघडपणाने सांगतादेखील येत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी म्हणून काहींच्या मुठी वळतात खऱ्या, पण उंच आकाशापर्यंत आपले हात पोचत नाहीत, असे दिसले की, त्याच मुठींच्या मागची मनगटे चावत युवक-युवती निराश होऊन नशीबाला दोष देतात. किंवा द्वेषाचा कारखाना चालविणाऱ्या एखाद्या जाती-धर्माच्या संघटनेचे गिऱ्हाईक बनतात. फेसबुक सोशल मीडियावर जीव खाऊन, शिवीगाळ करून हिंसक लेखन करून आपल्या नैराश्याला वाट करून देतात.

विकास-शिक्षण-कौशल्य-रोजगार यांचा तुटलेला सांधा

देशातील सद्य परिस्थितीमध्ये मुख्य मुद्दा असा आहे की, शिक्षण, विकास आणि रोजगार या तीन प्रक्रियांचा कोणताही परस्पर समन्वयच घातला गेलेला नाही. त्यामुळे हे तीनही घटक आपापल्या दिशेने भटकत जात आहेत. सर्वांत पहिले म्हणजे विकासाची तर जबाबदारीच सरकारने खासगी क्षेत्रावर टाकली आहे. देशाचे आर्थिक नियोजन ही संकल्पनाच हद्दपार केली आहे. दुसरीकडे शिक्षण ही जणू काही एखादी बाजारात खरेदी करायची आणि उपयोग करून घेण्याची कपड्यासारखी खासगी वस्तू असल्याचे सरकारने ठरविले आहे. याला अनुसरून तेथे नफा तत्त्वावर बाजारीकरणाचे राज्य आहे. भारतातील विकास-शिक्षण-रोजगार यांच्या आवश्यक अशा सांध्याचा काहीही विचार न करता अत्यंत नियोजनशून्य तऱ्हेने आणि आता तर खासगी शिक्षणसम्राटांच्या सोयीने शिक्षणाचे हे वस्त्र विणले जात आहे. त्यावर परिस्थितीचे पाणी पडताच त्याचे पायपुसणे झालेले आहे. शिवाय एकूण शिक्षणाचा दर्जा चांगला नाही. विश्वासार्हदेखील नाही. भारतातील अभियांत्रिकी महाविद्यालयतून जे अभियंते बाहेर पडत आहेत, त्यांच्यापैकी बहुतेक पदवीधरांना आवश्यक ते तांत्रिक व्यावसायिक शिक्षणच मिळालेले नसते, असे मत औद्योगिक व्यवस्थापनांकडून व्यक्त केले जात आहे.

तिसरीकडे रोजगार मिळणे ही देखील युवक किंवा विद्यार्थ्यांची खासगी जबाबदारी (नशीब) असल्याचे समजले गेले आहे. त्यामुळे त्याबाबत सरकारची कोणतीही जबाबदारीच नाही, अशी अधिकृत धारणा झाली आहे.

नव्या दृष्टिकोनाची गरज

बेरोजगारीची समस्या ही सर्वांत मोठी मानवी, आर्थिक आणि राजकीय समस्या आहे. बेरोजगारी ही आपल्या न वापरलेल्या क्षमतांची बेरीज असून, तिचा सांधा आपले पर्यावरण, नैसर्गिक संसाधने आणि मानवी-सामाजिक गरजांशी घालणे हे आव्हान आहे, अशा दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे. असे पाहिले तर, समस्येचे रूपांतर क्षमतेमध्ये आणि निरुपायचे रूपांतर शक्यतेमध्ये झाल्याचे दिसून येईल. अशा दृष्टीने विचार करून देशाच्या संपूर्ण राजकीय अर्थव्यवस्थेचे जनकेंद्री पुनर्आखणी करावी लागेल. त्यासाठी सर्व परंपरागत पूर्वग्रह आणि संकुचित द्वेष-दंगे, भंपक दिखाऊ बनावट वादांच्या चिखलातून बाहेर पडून विचार करावा लागेल.

# तुकोबांचा ज्वलंत विद्रोह : हभप मधुकर महाराज

२००३ साल असावे. लेन प्रकरण राज्यभर तापत होते. गावागावात जागृतीसाठी सभा, कोपरा बैठक होत होत्या. लोकांमध्ये संताप वाढत होता. त्याचाच एक भाग म्हणून माझे मूळ गाव पेठवडज येथे विवेकी युवकांनी मधुकर महाराज बारुळकर यांचे जाहीर व्याख्यान ठेवले होते. त्या दिवशी मी एका नातेवाईकांना भेटायला नांदेड येथे गेलो होतो. सभा संध्याकाळी ग्रामपंचायत समोर होती. संध्याकाळी मी आवर्जून मधुकर महाराज बारुळकर यांच्या जाहीर सभेस उपस्थिती लावली. त्यांचे ते रोखठोक पण मुद्देसूद बोलणे, टिपेचा आवाज, आकाशाकडे वर हात करून बोलण्याची पद्धत आणि त्यांनी मांडलेले तर्कशुद्ध आणि तर्ककठोर विचार ऐकता क्षणी मनात घर करून बसले. त्यांच्या सोबत, ते ज्या मराठा सेवा संघात काम करतात तिथे आपणही काम करावे अशी भावना हळूहळू होत गेली. महाराजांच्या बोलण्यात प्रचंड आत्मविश्वास होता कारण त्यांचे विचार सुस्पष्ट असे असल्याने तो आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यात आणि देहबोलीतूनही जाणवायचा. त्यांचा आणि माझा हा पहिला वहिला संपर्क आला ते माझे चुलत बंधू मारुती जाधव यांच्यामुळे.

त्यानंतर महाराज पायाला भिंगरी लावून महाराष्ट्रभर फिरत राहिले. अगदी काल परवा जेव्हा त्यांचा करुण अंत झाला तेव्हाही ते मराठा सेवा संघाच्याच कुटुंब मेळाव्यातून गावाकडे परत येत होते. नामदेव - तुकोबाराय वारकरी परिषदेच्या माध्यमातून महाराजांनी अवघा महाराष्ट्र पिंजून काढला. देतो तीक्ष्ण उत्तरे पुढे व्हावयासी बर हा जगद्गुरु तुकोबारायांचा वारसा घेऊन महाराज खेडोपाडी, वाडी, वस्ती तांड्यावर फिरत राहिले. कार्यक्रमाला जाण्यासाठी ना कोणत्या मोठ्या गाडीची गरज ना कसल्या बडेजावाची गरज. अगदी सहजपणे कोणामध्येही मिसळणारा हा जगद्गुरु तुकोबारायांचा अवलिया. लहान असो मोठा असो सर्वांशी मित्रत्वाने, प्रेमाने आणि सदैव हसत खेळत बोलणारे व्यक्तिमत्व म्हणजे मधुकर महाराज बारुळकर. महाराजांचे वाचन प्रचंड होते त्यांचा व्यासंग दांडगा होता. ज्ञानेश्वरी, गाथा, नामदेव महाराजांचा गाथा, एकनाथी भागवत त्याबरोबरच विविध धार्मिक ग्रंथ त्यांनी वाचून काढले होते. त्या ग्रंथांचा वेळोवेळी अभ्यासही ते करत असत. त्यामुळे त्यांच्या बोलण्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास जाणवत असे. धर्मासारख्या संवेदनशील प्रांतात वावरत असतानाही महाराजांनी तर्कशुद्ध विचारांचे कठोर वार श्रोत्यांवर केले.

परंतु कधीही श्रोत्यांच्या भावना दुखावल्या नाहीत. त्याचे कारण म्हणजे त्यांच्या विचारांना जोड होती ती संतांच्या विचारांची.

तसे पाहायला गेले तर महाराजांची कौटुंबिक पार्श्वभूमी ही काही व्यासंगी अशा कुटुंबाची नव्हती. महाराजांचे शिक्षणही तसे जेमतेमच झाले होते. शेती करत करत अक्षरांचे श्रम करणारा हा जगद्गुरु तुकोबारायांचा हाडाचा वारकरी होता. प्रबोधनाच्या माध्यमातून महाराष्ट्र पिंजून काढत असताना त्यांनी आपल्या लेकरांकडे कधीही



दुर्लक्ष होऊ दिले नाही. दोन मुलं व एक मुलगी यांना उच्च शिक्षण दिले. मुलीला शिक्षक तर दोन मुलांना राज्यसेवा आयोगाच्या परीक्षा पास करायला लावून त्यांना उच्च पदस्थ अधिकारीही केले. खरे तर सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या लोकांबद्दल नेहमी नाक मुरडले जाते. ही मंडळी जीवनात मागे राहतात, करिअरमध्ये मागे राहतात अशा पद्धतीचे दोषारोप त्यांच्यावर जाणीवपूर्वक केले जातात. हेतू एकच की तरुणांनी अशा संघटनांकडे जाऊ नये. परंतु महाराजांसारख्या कित्येक लोकांनी हा समज खोटा ठरवला. स्वतः महाराजांनी आपल्या मुलांना प्रचंड शिकवले.

अगदी काही दिवसांपूर्वीच त्यांच्या दोन्ही मुलांची पोस्टिंग चांगल्या पदावर झाली होती. थोडक्यात काय तर आयुष्यभर ज्यांनी अक्षरांचा श्रम केला होता त्या मधुकर महाराजांचा श्रम आत्ता कुठे खऱ्या अथार्ने फळाला आला होता. आता त्यांचा जीवनक्रम म्हणजे बैसोनी निवांत सुख भोगू अशाच पद्धतीचा राहिला असता. आठ दहा दिवसांपूर्वीच त्यांच्या मुलाचे लग्नही मोठ्या आनंदात आणि उत्साहात जमले होते. काही दिवसातच ते लग्नही मोठ्या आनंदाने पार पडले असते. महाराजांनी खरंच खूप स्वप्नही पाहिले असतील की आपण आपल्या नातवंडांना खेळवत खेळवत महाराष्ट्रभर जगद्गुरु तुकोबारायांचे शब्द धन वाटत फिरायचे. जगद्गुरु तुकोबारायांचे शब्द बीज पेरत फिरायचे. परंतु काळाला काहीतरी वेगळेच मान्य होते. 31 मार्च रोजी दिवसभर मराठा सेवा संघाच्या कौटुंबिक मेळाव्यामध्ये अत्यंत हसत खेळत आनंदाने उत्साहाने वावरणारे महाराज कार्यक्रम आटपून आपल्या मूळ गावी बारूळ येथे जात असता नांदेड येथील ढवळे कॉर्नर येथे त्यांचा भीषण असा अपघात झाला आणि महाराज जागीच गतप्राण झाले.

माझे चुलत बंधू मारुती जाधव यांनी माझा आणि महाराजांचा पहिला संपर्क घडून आणून दिला होता. त्याच भावाचा मला फोन आला की मधुकर महाराज गेले आणि मला प्रचंड धक्का बसला. परंतु जेव्हा त्यांच्या अपघाताच्या बातम्या आणि व्हिडिओ पाहिले तेव्हा काळजामध्ये चर्र झाले. अगदी शत्रूलाही असे मरण येऊ नये अशा परिस्थितीत महाराज आपणा सर्वांना सोडून गेले.

खरे तर मधुकर महाराजांसारखा वैचारिक कार्यकर्ता, हजारो लोकांना प्रेरणा देणारा वक्ता आणि हजारो भक्तांना वारकरी संप्रदायाचा विचार सांगणारा हाडाचा वारकरी निर्माण होण्यासाठी कित्येक वर्ष जावे लागतात. तशातच नाही भीड भार तुका म्हणे सान थोर या वृत्तीने बोलणारे मंडळी बरीच कमी झालेली आहेत. जी बोलत होती त्यांनी आपल्या तलवारी म्यान करून ठेवलेल्या आहेत. परंतु काहीही झालं तरी आपला तुकोबारायांचा वारकरी बाणा मात्र कमी करायचा नाही याच विचारांनी झपाटलेले महाराज शेवटपर्यंत आपल्या विचारांचे बॉम्बगोळे श्रोत्यांवर टाकत राहिले. त्यांना पाहिलं की समोरच्या व्यक्तीच्या मनामध्ये एक वेगळीच ऊर्जा निर्माण व्हायची. अंगावर पांढरे शुभ्र कपडे. संपूर्ण पेहराव वारकरी. कपाळावर ठसठशीत वारकरी गंध. चेहऱ्यावर सदैव हास्य असणारे महाराज आज महाराष्ट्राला रडवूडन गेले. खूप कष्ट केल्यानंतर एखाद्याच्या समोर भरलेलं ताट यावं आणि त्या ताटावरून अचानक त्याला उठून जाण्याची वेळ यावी अगदी अशीच वेळ महाराजांच्या जीवनामध्ये आली.

त्यांच्यासारखा कीर्तनकार आपल्यातून निघून जाणे हे केवळ त्यांच्या कुटुंबाची, गावाची हानी नसून सबंध मानव जातीची हानी आहे. महाराजांचे कार्य पुढे नेणे हीच खऱ्या अथार्ने महाराजांना श्रद्धांजली ठरेल. आम्हा वारकऱ्यांची पांडुरंगाकडे कायम एक तक्रार असेल, पांडुरंगा मृत्यू कुणालाही चुकला नाही... पण विचारांशी अव्यभिचारी निष्ठा असणाऱ्या मधुकर महाराजांना असे न्यायला नव्हते पाहिजे

**हभप डॉ बालाजी महाराज जाधव**
गाथा सेवक
मो. ९४२२५२८२९०

# ट्रम्पशाही विरोधात अमेरिकन जनता रस्त्यावर

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हुकूमशाही आणि युद्धखोर वृत्तीने संपूर्ण जग वैतागले आहे. आपल्या हेकेखोरापणामुळे संपूर्ण जगाला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प यांच्यावर जगभरातील जनता वैतागली आहे कारण त्यांनी ज्याप्रकारे इराणवर हल्ला करून संपूर्ण जगाला वेठीस धरले ते कोणालाही आवडले नाही. ट्रम्प यांच्या हुकूमशाही वृत्तीला आता त्यांच्या देशातील जनताही वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने दीड वर्षापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे. विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. कोणताही विचार न करता इराणवर हल्ला करण्याचा डोनाल्ड ट्रम्प यांच्या आततायी निर्णयाचा निषेध करण्यासाठी अमेरिकेत लाखो लोक रस्त्यांवर उतरले अमेरिकेचा राष्ट्रध्वज उलटा करून नागरिकांनी ट्रम्प यांचा अनोख्या पद्धतीने निषेध केला. या आंदोलनाला आंदोलनकर्त्यांनी नो किंग्ज असे नाव दिले. आम्हाला राजा नको तर लोकशाही मानणारा राष्ट्राध्यक्ष हवा जो लोकशाहिवृत्तीने देशाचा कारभार करेल अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिले. ट्रम्प यांची छबी विदुषकी रूपात दाखवून डोनाल्ड ट्रम्प चालते व्हा! अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिल्या. या आंदोलनात लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील लोक रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनात महिलांची संख्याही लक्षणीय होती. ट्रम्प यांनी कोणताही मागचा पुढचा विचार न करता इराणवर हल्ला केला. खामेनी यांची हत्या करून दोन चार दिवसात इराणवर सहज विजय मिळवू अशा थाटात इराणवर हल्ला करणाऱ्या ट्रम्प यांना महिना उलटून गेला तरी इराणवर विजय मिळवता आला नाही. इराणला शरण आणण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ट्रम्प यांच्यावरच आता युद्धातून माघार घेण्याची वेळ आली आहे. ट्रम्प यांच्यामुळे संपूर्ण जगात अमेरिकेची नाचक्की होत आहे ही बाब अमेरिकेच्या जनतेला आवडली नाही म्हणूनच ते ट्रम्प यांच्या निषेधार्थ रस्त्यावर उतरत आहे अर्थात ट्रम्प यांच्याविरोधात अमेरिकन लोक रस्त्यावर उतरण्याची ही पहिलीच वेळ नाही. वर्षभरापूर्वी स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली होती. त्या आंदोलनाला आंदोलकांनी गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले होते. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनातही लाखो नागरिक रस्त्यावर जमले होते. त्यावेळी सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला होता. ते आंदोलन शांततेत पार पडले तरी त्या आंदोलनातही आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला होता. त्याआधीही अमेरिकन लोकांनी ट्रम्प यांच्याविरोधात रस्त्यावर उतरून असेच आंदोलन केले होते त्या आंदोलनाला हँडस ऑफ असे नाव दिले होते. त्या आंदोलनातही लोकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त करणाऱ्या घोषणा दिल्या होत्या. आताचे आंदोलनही त्याच धर्तीवर शांततेत पार पडत असले तरी लोक ट्रम्प यांच्या विरोधात तितकाच रोष व्यक्त करत आहेत. या आंदोलनाविषयी सांगताना आंदोलनकर्ते म्हणतात आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. हे आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे आंदोलनकर्ते सांगत आहेत. या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला असून त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील हे आंदोलनही शांततेत पार पडत असल्याने कोणालाही अटक करण्यात आले नाही मात्र या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली आहे. ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार. राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरुवातीला इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले याचा परिणाम जितका जगावर झाला तितकाच तो अमेरिकेवर देखील झाला. या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती निर्माण झाली. ट्रम्प यांनी हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत. आता तर इराणवर हल्ला करून ट्रम्प यांनी अमेरिकन जनतेला महागाईच्या खाईत लोटले. ट्रम्प यांच्या या सर्व निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे. जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. एककल्ली, मनमानी कारभार केला तर जनता ती खपवून घेत नाही हेच या आंदोलनातून अमेरिकन जनतेने दाखवून दिले आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# आ. समाधान आवताडे यांचे तातडीच्या पंचनाम्याचे निर्देश



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** मंगळवेढा तालुक्यातील नंदेश्वर येथे बुधवारी रात्री झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अनपेक्षित नैसर्गिक आपत्तीमुळे परिसरातील द्राक्षबागा, इतर फळबागा तसेच बेदाणा शेडचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, वीज पडून गाय व शेळी दगावल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार समाधान आवताडे यांनी घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची सविस्तर माहिती घेतली तसेच त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

या दौऱ्यात प्रांताधिकारी माळी, तहसीलदार मदन जाधव, तालुका कृषी अधिकारी मिसाळ मॅडम, तालुका पंचायत समिती सभापती दिपाली ताड, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, उपनगराध्यक्ष भगत, पंचायत समिती सदस्य आप्पासाहेब निकम तसेच गावातील पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार समाधान आवताडे यांनी प्रशासनाला तत्काळ नुकसानग्रस्त द्राक्षबागा, फळबागा, बेदाणा शेड तसेच धोंडीराम गरंडे या शेतकऱ्याच्या जर्सी गाईच्या मृत्यूबाबत पंचनामे करून त्वरित अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच शेतकऱ्यांना आजच्या आज शासनाकडून तातडीची मदत मिळावी यासाठी महसूल व पशुसंवर्धन विभागाने त्वरीत कार्यवाही करावी, असे स्पष्ट सांगितले. अशा संकटाच्या काळात शेतकरी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले असून, शासन स्तरावर आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **MALANG MORUBABA MUJAWAR** To **MALANG MIRABABA MUJAWAR** for passport issuance

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **SACHIN GURPADAYYA HIREMATH** To **SACHIN GURUPADAYYA HIREMATH.** for passport issuance

## वात्रटिका

### राष्ट्रवाद उफाळतो

उचापत्या आणि कटकरे
सांगा कुणाला पटेल...
मी राष्ट्रवादी म्हटल्यावर
कोणाला कसे खरे वाटेल...
हकालपट्टी होण्या आधी
आपणच बाजूला व्हावे...
असो त्यांचे ते बघतील
आपण कशाला नाक
खुपसावे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003

फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.

Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# एनटीपीसीत वृक्ष उत्पादक-खरेदीदार मेळावा; शेतकऱ्यांना नव्या संधींची ओळख



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एनटीपीसी सोलापूरच्या वतीने सामाजिक जबाबदारी (सीएसआर) विभागाच्या सहकार्याने आरएलआय सभागृहात वृक्ष उत्पादक आणि खरेदीदार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कृषी-वनीकरण, बांबू व वृक्ष आधारित शेती, मूल्यवर्धन आणि थेट बाजारपेठ जोडणी याबाबत शेतकरी व उत्पादकांना मार्गदर्शन करणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमात एनटीपीसीचे कार्यकारी संचालक बी. जे. एस. शास्त्री यांनी वृक्ष आधारित शेती ही पर्यावरण संवर्धनासोबतच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात शाश्वत वाढ करण्यासाठी उपयुक्त ठरते, असे प्रतिपादन केले. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक एम. के. श्री. बाबू (संचालन व सुरक्षा), अतिरिक्त महाव्यवस्थापक कन्हैया दास, लक्ष्मण आवार (मानव संसाधन) तसेच विभागीय वन अधिकारी शुभांगी जावळे उपस्थित होते. मेळाव्यात तज्ज्ञांनी प्रगत वृक्षारोपण तंत्रज्ञान, ऊती संवर्धन, कार्बन क्रेडिट, मधमाशी पालन, रेशीम उत्पादन आणि पालापाचोळा आधारित उद्योगातील संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. याशिवाय कौशल्याधारित प्रात्यक्षिक प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यामुळे शेतकरी आणि वृक्ष उत्पादकांना खरेदीदारांशी थेट संवाद साधण्याची, बाजारपेठेतील मागणी समजून घेण्याची आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळवण्याची संधी मिळाली. उत्पादनाला योग्य दर मिळवण्यासाठी आणि उत्पन्नाचे नवे मार्ग शोधण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. एनटीपीसीकडून भविष्यातही अशा लोककल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# धुळीच्या विळख्यात मोहोळचा मेन रोड व्यापारी व नागरिक हैराण

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या पूर्व आणि पश्चिम भागाला जोडणारा तसेच बाजारपेठेचा सर्वाधिक महत्त्वाचा असलेला मुख्य रस्ता सध्या अतिशय दयनीय अवस्थेत आहे. रस्त्यावर पूर्वी खड्डयांचे साम्राज्य होतेच; मात्र गतवर्षी हे खड्डे माती व मुरमाने बुजविल्यामुळे आता या मार्गावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून व्यापारी आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

दररोज सकाळी दुकाने उघडल्यानंतर व्यापाऱ्यांना समोरील धूळ आणि माती साफ करण्यासाठी अतिरिक्त वेळ आणि श्रम घालवावे लागत आहेत. या धुळीमुळे श्वसनाचे आजार होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत आहे.

एकीकडे नगरपरिषद विविध कर वसुली करत असताना नागरिकांना मूलभूत सुविधा मात्र मिळत नसल्याची खंत व्यापारी वर्गातून व्यक्त होत आहे. बाजारपेठेत खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांनाही धुळीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, रस्त्याच्या मधोमध उभारण्यात आलेल्या खांबांवर राजकीय फलकांची गर्दी वाढली असून त्यांचे लोखंडी पाईप खाली असल्यामुळे वाहनचालकांच्या डोक्याला धडकून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बाब प्रशासनाच्या दुर्लक्षाचे प्रतीक असल्याची टीका होत आहे. विशेष म्हणजे शहराच्या इतर भागांत काँक्रिटीकरणाची कामे सुरू असताना, सर्वाधिक वर्दळीच्या या मुख्य रस्त्याकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. गेल्या पाच वर्षांत या रस्त्यासाठी कोणताही ठोस निधी मंजूर न झाल्याबद्दल नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

आगामी काळात मोहोळचे ग्रामदैवत श्री सिद्ध नागेश यांची यात्रा होणार असून या काळात मोठ्या प्रमाणावर भाविक या मार्गाने मंदिराकडे जातात. त्यामुळे यात्रेपूर्वी तरी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरत आहे. नगरपरिषद निवडणुकीदरम्यान विविध नेत्यांनी या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत मोठी आश्वासने दिली होती. मात्र निवडणुकीनंतर तीन महिने उलटूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे आता तरी या रस्त्याच्या दुरुस्तीचा शुभारंभ होणार का? असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# सोलापुरात तापमानाचा पारा चढला, महापालिकेची तयारी




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून पारा चाळीशीच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. एप्रिल अखेर तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली असून, या पार्श्वभूमीवर उष्माघाताचा धोका लक्षात घेऊन सोलापूर महानगरपालिकेने विशेष उपाययोजना सुरू केल्या आहेत.

शासनाच्या सूचनेनुसार महापालिकेच्या आरोग्य विभागाला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. उष्माघात ही गंभीर व जीवघेणी स्थिती ठरू शकते. शरीराचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्यास मेंदू, हृदय आणि इतर अवयवांवर परिणाम होण्याचा धोका वाढतो.

यासाठी महापालिकेने शहरातील १५ आरोग्य केंद्रांमध्ये प्रत्येकी दोन बेड राखीव ठेवले असून, उष्माघाताच्या रुग्णांवर तातडीने उपचार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी नागरिकांना दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडणे टाळण्याचे, पुरेसे पाणी पिण्याचे तसेच डोक्यावर संरक्षणासाठी टोपी किंवा ओढणी वापरण्याचे आवाहन केले आहे.

**असे करावेत प्राथमिक उपचार :**

* रुग्णाला त्वरित सावलीत किंवा थंड ठिकाणी हलवावे
* कपडे सैल करून शरीर थंड ठेवावे
* थंड पाण्याने अंग पुसावे किंवा ओल्या कापडाने शेक द्यावा
* शुद्धीवर आल्यास पाणी किंवा ओआरएस द्यावे
* गंभीर स्थितीत त्वरित रुग्णालयात दाखल करावे

**उष्माघाताची लक्षणे :**

* शरीराचे तापमान ४० अंशांपेक्षा जास्त होणे
* डोकेदुखी, चक्कर येणे
* अशक्तपणा व थकवा
* घाम येणे बंद होणे, त्वचा कोरडी व तापलेली होणे
* गोंधळ किंवा शुद्ध हरपणे
* जलद नाडी व श्वासोच्छ्वास

**उष्माघात टाळण्यासाठी उपाय :**

* दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळावे
* भरपूर पाणी पिऊन शरीर हायड्रेट ठेवावे
* सावलीत किंवा थंड ठिकाणी राहावे
* लिंबूपाणी, ताक, फळांचे रस यांचे सेवन करावे

नागरिकांनी उष्णतेची लक्षणे दिसताच त्वरित जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# महापालिकेची २३० कोटींची करवसुली; मागील वर्षापेक्षा ४० कोटींची वाढ



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने गत आर्थिक वर्षात सुमारे २३० कोटी रुपयांची करवसुली केली असून, ही मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ४० कोटी रुपयांनी अधिक असल्याची माहिती विभागप्रमुख युवराज गाडेकर यांनी दिली.

शहरातील सुमारे २ लाख ७५ हजार मालमत्तांची नोंद महापालिकेकडे असून, या वर्षी ३१८ कोटी ४७ लाख रुपयांचे वसुलीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. उद्दिष्टाच्या तुलनेत वसुली काही प्रमाणात कमी असली तरी एकूण वसुलीत वाढ झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. १४ मार्च रोजी झालेल्या लोकअदालतीनंतर थकबाकीदारांसाठी कर व दंडावर ५० टक्के सूट देणारी योजना सुरू करण्यात आली. या योजनेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून केवळ १७ दिवसांत ९ हजार ४५३ थकबाकीदारांनी १७ कोटी २४ लाख ९९ हजार २४५ रुपयांचा कर जमा केला.

३१ मार्च रोजी एकाच दिवशी १ हजार ४०८ मिळकतदारांनी २ कोटी ८८ लाख ६२ हजार ९८० रुपयांची भर घातली. यामुळे एकूण वसुली २३० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

दरम्यान, इतर स्त्रोतांमधून मिळून महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने एकूण २७९ कोटी ३९ लाख २५ हजार ३०० रुपयांची वसुली केली आहे. महापालिकेने गत आर्थिक वर्षात ८७.७४ टक्के वसुली साध्य केली असून सुधारित अंदाजपत्रकातील २४० कोटींच्या उद्दिष्टाच्या तुलनेत ८२ टक्के वसुली झाल्याची माहिती गाडेकर यांनी दिली. कर वसुलीत झालेली वाढ ही महापालिकेसाठी सकारात्मक बाब मानली जात असून, आगामी काळात वसुली आणखी वाढविण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

# ‘प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढवा दिखाऊ काम नको, निकाल हवा!’

## चेतनसिंह केदार सावंत यांचे स्पष्ट आदेश




जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी गुरुवारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सांडसमळा वाढेगाव, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र वाढेगाव व प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आंधळगाव या ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली. प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा साठा, तपासणी यंत्रणा आणि रुग्णांना दिल्या जाणाऱ्या उपचार पद्धतींची सखोल पाहणी करण्यात आली.ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने सेवा मिळावी, यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहून काम करावे आणि कोणत्याही रुग्णाला उपचाराविना परत पाठवू नये, असे निर्देश पाहणीत देण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करून सुविधा सुधारण्याच्या सूचना दिल्या. आरोग्य सेवांचा आढावा घेण्यासाठी अचानक भेट देऊन प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधसाठा व स्वच्छतेची पाहणी केली. रुग्णसेवा अधिक सक्षम करण्यासाठी डॉक्टर व कर्मचाऱ्यांना दर्जेदार सेवा देण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिल्या.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रशासनाने तातडीने कामाला लागावे, असा कडक इशारा देत जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी पदभार स्वीकारताच शिक्षण विभागाला स्पष्ट दिशा दिली. ‘फक्त कागदोपत्री काम नको, प्रत्यक्ष निकाल दिसला पाहिजे,’अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. प्राथमिक शाळांचा पट वाढला पाहिजे, यासाठी प्रयत्न करावेत. शाळांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव पाठविण्यात यावेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील रहावे. शिक्षण क्षेत्रात नवनवीन कल्पना अंमलात आणाव्यात. आदर्श शाळा, गुणवंत विद्यार्थी व गुणवंत शिक्षकांना पाठबळ द्यावे. शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. राज्यात नावलौकिक होईल असा शिक्षण विभागाने कारभार करावा अशा सूचना देत जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला. जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी जिल्हा परिषदेत आल्यानंतर नतमस्तक होऊन सभापती पदभार स्वीकारला. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, सांगोला पंचायत समितीच्या सभापती पुनम इंगवले, बाळासाहेब एरंडे, जिल्हा परिषद सदस्य अतुल पवार, जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब लवटे, योगेश पाटील, दत्ता जाधव, उमेश पाटील, उपसभापती अजय सरगर, युवासेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख सागर पाटील, योगेश खटकाळे, बाळासाहेब आसबे, दुर्योधन हिप्परकर, बाळासाहेब काटकर, संभाजी आलदर, पंचायत समिती सदस्य डॉ.सदाशिव दबडे, पंचायत समिती सदस्य बापू जावीर, जुबेर मुजावर,अफजल शेख, संजय केदार, सचिन देशमुख, महावीर कदम, मदन दराडे, लतिफ तांबोळी, राजेश शिंदे, अमोल कुलकर्णी, शिवराज पुकळे, नितीन मोहिते, अविनाश गोरे, डॉ.अविनाश खांडेकर,सुधीर गाडे, विशाल बनसोडे, माजी सरपंच नंदकुमार दिघे, अनिल दिघे, पोपट गडदे, दादा खरात, बाळासाहेब झपके, प्रशांत वलेकर, अनिल केदार अण्णा पाटील, प्रकाश घोडके, अंकुश आवताडे, बाळासाहेब केदार, संभाजी चव्हाण, अजित गोडसे, अमोल साखरे, राहुल केदार, यांच्यासह अनेकांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी शिक्षण विभागाची आढावा बैठक घेतली. यावेळी शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी शिक्षण विभागाची संपूर्ण माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना सभापती चेतनसिंह केदार यांनी शिक्षण विभागाचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील राहावे. गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना दिल्या.

# पंधराव्या वित्त आयोगातून झेडपीला १७१.४० कोटींचा निधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंधराव्या वित्त आयोगांतर्गत २०२२-२३ ते २०२५-२६ या कालावधीत सोलापूर जिल्हा परिषदेला एकूण १७१ कोटी ४० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. यामध्ये जिल्हा परिषद मुख्यालय स्तरासाठी ८५ कोटी ७० लाख तर पंचायत समिती स्तरासाठी तितकाच ८५ कोटी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीतून पिण्याचा पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन तसेच इतर मूलभूत सुविधा आणि पायाभूत विकासकामे हाती घेण्यात येत असल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी दिली.

प्राप्त निधीचा पारदर्शक आणि परिणामकारक वापर करण्याच्या सूचना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या असून, त्या अनुषंगाने पंचायत समिती स्तरावरून संबंधित ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्यात येत असल्याचेही भुजबळ यांनी सांगितले.

जिल्हा परिषद अध्यक्ष दिपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी या निधीमुळे ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा होऊन विकासकामांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

दरम्यान, पंचायत समितीनिहाय निधी वितरणामध्ये माळशिरस (११.३३ कोटी), पंढरपूर (१०.०१ कोटी), माढा (८.८७ कोटी), सांगोला (८.७६ कोटी), दक्षिण सोलापूर (७.८८ कोटी), अक्कलकोट (७.५८ कोटी), करमाळा (७.३४ कोटी), मोहोळ (७.३० कोटी), बार्शी (७.२४ कोटी), मंगळवेढा (५.८० कोटी) आणि उत्तर सोलापूर (३.५९ कोटी) यांचा समावेश आहे.

या निधीमुळे ग्रामीण भागातील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा अपेक्षित आहे.

# मुदत संपली तरी ‘यूजर चार्जेस’ वसुली सुरूच



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेकडून शहरातील मिळकतदारांकडून विविध करांच्या वसुलीत गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी केला आहे. सभागृहात मंजूर ठरावाला डावलून मुदत संपल्यानंतरही ‘यूजर चार्जेस’च्या नावाखाली दरवर्षी ६०० रुपयांची वसुली सुरूच ठेवण्यात आल्याचा त्यांनी आरोप केला.

शहरासह हद्दवाढ भागात भुयारी गटार योजना आणि ड्रेनेज लाईनच्या कोट्यवधी रुपयांच्या कामांसाठी महापालिकेचा हिस्सा उभारण्यासाठी सन २०१० पासून प्रत्येक मिळकतदाराकडून मालमत्ता कराच्या बिलातून दरवर्षी ६०० रुपये वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ही वसुली केवळ १० वर्षांसाठी म्हणजे सन २०२० पर्यंत करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. मात्र संबंधित कालावधी संपूनही २०२५-२६ पर्यंत ही वसुली सुरू ठेवण्यात आली असून नव्या आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्येही ती कायम ठेवण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असल्याचा आरोप शिंदे यांनी केला. याशिवाय सन २०१९ पासून घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून ‘उपकर निधी’ या नावाने आणखी ६०० रुपयांची वसुली करण्यात येत आहे.

शहरातील अनेक भागात नियमित घंटागाडी सेवा उपलब्ध नसतानाही हा कर वसूल केला जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

दोन्ही कर स्वच्छतेशी संबंधित असताना एकाच मालमत्ता कर बिलातून वेगवेगळ्या नावाने वसुली का केली जाते, असा सवाल उपस्थित करत अंदाजपत्रकातील सुमारे २५ कोटी रुपयांच्या जमा बाजूत घोळ झाल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. दरम्यान, या प्रकरणामुळे महापालिका प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळत आहे.

# पाणीटंचाईवर खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा लोकसभेत प्रश्न




**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माढा लोकसभा मतदारसंघातील वाढत्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी लोकसभेत आवाज उठवत केंद्र सरकारचे लक्ष वेधले. मतदारसंघातील रखडलेले जलजीवन मिशनची कामे व दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून, तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. मतदारसंघात ‘जल जीवन मिशन’ अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा उल्लेख करत, ही कामे अद्याप अपूर्ण का आहेत, ते कधी पूर्ण होणार असा सवाल त्यांनी उपस्थित केला. लोकसभेतील चर्चेदरम्यान बोलताना खा.मोहिते-पाटील यांनी जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पाणीटंचाईचे भीषण वास्तव मांडले.

अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावल्यामुळे शेती आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. तात्पुरत्या उपायांऐवजी दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक असल्याचे सांगत, जलसंधारण आणि भूजल पुनर्भरणासाठी माढा लोकसभा मतदारसंघाला विशेष आर्थिक पॅकेज देण्याची मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली.

भविष्यातील दुष्काळ टाळण्यासाठी केंद्र सरकारकडे नेमका कोणता कृती आराखडा आहे, तसेच टंचाईग्रस्त भागांना प्राधान्य कधी दिले जाणार, याबाबतही त्यांनी सभागृहात प्रश्न उपस्थित केले. माढा मतदारसंघातील नागरिकांना पाणीटंचाई पासून दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करून प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदार मोहिते-पाटील यांनी यावेळी केली.

# अंकुश चव्हाण यांना भारतीय लष्कराकडून प्रतिष्ठित ‘दक्षिणी कमान सरसेनापती प्रशंसा पदक ‘प्रदान’



**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** भारतीय सशस्त्र दलांसोबत कार्य करताना दाखवलेल्या उत्कृष्ट कर्तव्यनिष्ठा, निःस्वार्थ समर्पण आणि उल्लेखनीय सेवेबद्दल पुणे येथील संरक्षण जनसंपर्क अधिकारी भारतीय माहिती सेवेतील अधिकारी अंकुश चव्हाण यांना प्रतिष्ठित दक्षिणी कमान चा लष्कर प्रमुख पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

हा सन्मान दक्षिण कमांड चे सरसेनापती लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, पीव्हीएसएम, यूवायएसएम, एव्हीएसएम, जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, सदर्न कमांड पुणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

विशेष म्हणजे, सन १९८४ नंतर हा मानाचा सन्मान प्राप्त करणारे चव्हाण हे पुणे येथील पहिले नागरी संरक्षण जनसंपर्क अधिकारी ठरले आहेत. त्यांच्या कार्यातील निष्ठा, समर्पण आणि उत्कृष्टतेची ही महत्त्वपूर्ण दखल मानली जात आहे.

या सन्मानामुळे नागरी अधिकाऱ्यांच्या योगदानाची दखल घेतली जात असून, भारतीय सशस्त्र दलांसोबत प्रभावी समन्वय साधण्यात चव्हाण यांनी बजावलेली भूमिका अधोरेखित झाली आहे.

कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाचे ते विद्यार्थी आहेत. ते मोहोळ तालुक्यातील खुनेश्वर येथील असून ग्रामीण भागातून येऊन उच्चपदस्थ ठिकाणी काम करीत असताना त्यांनी हा पुरस्कार पटकावून सोलापूर जिल्ह्याची मान देशात उंचावली आहे.

संरक्षण क्षेत्रातील जनसंपर्क, माध्यम समन्वय आणि संवेदनशील माहितीचे अचूक व जबाबदारीने व्यवस्थापन या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे.

विशेष म्हणजे, नागरी अधिकाऱ्यांना क्वचितच मिळणारा हा सन्मान त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देतो.

त्यांचे कार्य केवळ व्यावसायिक उत्कृष्टतेचे नव्हे तर राष्ट्रसेवेप्रती असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे.


# पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

पत्ता:- नगरपरिषद कार्यालय, भादुले चौक, पंढरपूर
दूरध्वनी क्र. ०२१८६ २२३०१२
अग्निशमन केंद्र दूरध्वनी क्र. ०२१८६ २२२१०१
ई मेल:- coud.pandharpur@maharashtra.gov.in

जा.क्रं./पंनपं/उद्यान/३३८०/२०२५ दि. ०२/०४/२०२६

**वृक्षप्राधिकरण**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ कलम ८ (३) अन्वये जाहीर सूचना**

अर्जदार श्री. नुसार हर्षद प्रसाद गायकवाड, रा- मलपे प्राईड, इसबावी, पंढरपूर यांच्या कडून इकडील कार्यालयास प्राप्त अर्जात नमुद केल्या प्रमाणे अर्जदार त्यांच्या मलपे प्राईड सोसायटीमधील रस्त्याच्या मध्यभागी एक झाड आहे.सदर झाडामुळे येथील ये-जा करणाऱ्या वाहतुकीस अडथळा निर्माण झाला असून त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता सदर झाड तोडून घेणे करिता नगरपरिषदेस कळविले आहे.

सदर झाडे तोडण्याकरिता महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ कलम ८ (२) अन्वये वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर केला आहे. वृक्षप्राधिकरणा कडे प्राप्त अर्जा बाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृतपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ दिवस कालावधी मध्ये हरकती व सूचना मागविण्याबाबत सूचित केले आहे.

त्या अर्थी अर्जदार यांनी सादर केलेल्या पिंपळाचे ०१ झाड तोडणे या अर्जाच्या अनुषंगाने तसेच अटी व शर्तीस आधीन राहून सदर जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी काही सूचना व हरकती असल्यास नागरी सुविधा केंद्र, पंढरपूर नगरपरिषद कार्यालय या ठिकाणी ७ दिवसात लेखी जमा कराव्यात. मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या सूचना व हरकती ग्राह्य राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(श्री. महेश रोकडे)**
**वृक्ष प्राधिकरण अधिकारी**
**तथा मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**